**L. A. BILL No. LVI OF 2026.**

*A BILL*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STAMP ACT.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५६.**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ७ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक ८ जुलै, २०२६ रोजी शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे.)**

१९५८ चा ६०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र मुद्रांक (चौथी सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या अनुसूचीची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमास जोडलेल्या अनुसूची एकमध्ये,— १९५८ चा ६०.

(एक) अनुच्छेद ३४ नंतर, पुढील अनुच्छेद समाविष्ट करण्यात येईल :—

**"३४अ. हमी-**

(अ) वित्तीय किंवा बँक हमी,-

| | |
|---|---|
| (एक) जर अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेली हमीची रक्कम पाच लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल तर, | किमान पाचशे रुपयांच्या अधीन राहून, अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या ०.१ टक्के; |
| (दोन) इतर कोणत्याही बाबतीत, | कमाल वीस लाख रुपयांच्या अधीन राहून,अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या ०.३ टक्के; |
| (तीन) जेथे सार्वजनिक बांधकामांच्या किंवा सार्वजनिक खरेदीच्या, शासकीय महामंडळाच्या, स्थानिक प्राधिकरणाच्या, किंवा सांविधिक संस्थेच्या नावे हमी दिलेली असेल त्या बाबतीत, | पाचशे रुपये; |
| (चार) हमी दिलेल्या रकमेमध्ये वाढ न करता, विद्यमान वित्तीय किंवा बँक हमीचे नुतनीकरण किंवा मुदतवाढ, | कमाल पंचवीस हजार रुपयांच्या अधीन राहून, विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या ०.२५ टक्के. |
| (ख) हमीपत्र (खंड (अ) मध्ये नमूद केलेले संलेख वगळून ). | पाचशे रुपये."; |

(दोन) अनुच्छेद ३७ मध्ये, स्तंभ (१) मधील, "हमीपत्र (लेटर ऑफ गॅरंटी).—कबुलायत (क्रमांक ५) पहा" हा मजकूर वगळण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५६.]**

**[ महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. चंद्रशेखर बावनकुळे,**
महसूल मंत्री.**]**

**(विधानसभेने दिनांक ७ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक ८ जुलै, २०२६ रोजी शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे.)**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.